जनसंपर्क कक्ष
20 APR 2022
लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तेच खरे 'व्यवस्थापनशास्त्राचे मानकरी'

## डी. टी. शिर्के : ए. एम. गुरव व साळुंखे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विद्यार्थी, अभियंता, उद्योजक, धोरणकर्ते यांच्यासाठी 'व्यवस्थापनशास्त्राचे मानकरी' हे पुस्तक उपयुक्त ठरणारे आहे. विद्यार्थ्यांना बोलते करणारे हे पुस्तक आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी शनिवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील डॉ. ए. एम. गुरव आणि डॉ. आर. एस. साळुंखे लिखित 'व्यवस्थापनशास्त्राचे मानकरी' या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. गुरव यांचे हे ३३ वे पुस्तक आहे, ही अभिमानास्पद बाब आहे. या पुस्तकात त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील २१ व्यवस्थापन गुरूंचे कार्य संकलित केले आहे. शिक्षकांना त्या आधारे विद्यार्थ्यांकडून २१ सेमिनार करवून घेता येतील.



शिवाजी विद्यापीठात शनिवारी डॉ. ए. एम. गुरव व डॉ. आर. एस. साळुंखे यांच्या 'व्यवस्थापनशास्त्राचे मानकरी' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, या पुस्तकात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यवस्थापन शास्त्रज्ञांची केलेली अभ्यासपूर्ण मांडणी, त्यांचे विचार, मानसिक क्रांती, समस्या शास्त्रीय पद्धतीने सोडविण्याची हातोटी, कामामध्ये हार न मानण्याची वृत्ती, आदी बाबींच्या शिकवणीमुळे हे पुस्तक विद्यार्थ्यांना लाभदायक ठरेल.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. एस. एस. महाजन, डॉ. व्ही. एस. पाटील, बी. के. काटकर, महेश चव्हाण, आदी उपस्थित होते. डॉ. गुरव यांनी स्वागत केले. डॉ. साळुंखे यांनी पुस्तक परिचय करून दिला. के. व्ही. मारूलकर यांनी आभार मानले.

20 APR 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना बोलते करणारे पुस्तक

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : डॉ. ए. एम. गुरव यांच्या व्यवस्थापन शास्त्राचे मानकरी पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थी, अभियंता, उद्योजक, धोरणकर्ते यांच्यासाठी 'व्यवस्थापन शास्त्राचे मानकरी" हे पुस्तक विद्यार्थ्यांना बोलते करणारे पुस्तक आहे, असे कौतुकोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातील डॉ. ए. एम. गुरव व डॉ. आर. एस. साळुंखे लिखित 'व्यवस्थापन शास्त्राचे मानकरी" या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळयात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पदवी, पदव्युत्तर पदवी, संशोधक, व्यवस्थापन, सांख्यिकी, आंतरविद्याशाखीय विद्यार्थी यांच्यासह सर्वच घटकातील अभ्यासकांसाठी हे पुस्तक उपयुक्त आहे. विद्यापीठाच्या हिरकमहोत्सवी वर्षात विद्यापीठ व महाविद्यालयांतील शिक्षकांकडून जास्तीत जास्त चांगली पुस्तके प्रकाशित व्हायला हवीत. डॉ. गुरव यांचे हे ३३ वे पुस्तक आहे. या पुस्तकात त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील २१ व्यवस्थापन गुरूंचे कार्य संकलित केले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, या पुस्तकात राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवरील व्यवस्थापन शास्त्रज्ञांनी केलेली अभ्यासपूर्ण मांडणी, त्यांचे विचार, मानसिक क्रांती, समस्या शास्त्रीय पद्धतीने सोडविण्याची हातोटी, कामामध्ये हार न मानण्याची वृत्ती अशी शिकवण लाभदायक ठरेल.

डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पुस्तकाचे सहलेखक डॉ. आर. एस. साळुंखे यांनी पुस्तक परिचय करून दिला. डॉ. के. व्ही. मारूलकर यांनी आभार मानले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. एस. एस. महाजन, डॉ. व्ही. एस. पाटील, डॉ. काटकर, महेश चव्हाण आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : डॉ. ए.एम. गुरव व डॉ. आर. एस. साळुंखे यांच्या "व्यवस्थापन शास्त्राचे मानकरी" या पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, जी. आर. पळसे व इतर.**

सकाळ

# नोकरी, उद्योगासाठी नावीन्यपूर्ण कौशल्य आवश्यक : गावडे

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १९ : नोकरी मिळविण्यासाठी व उद्योग उभारण्यासाठी नावीन्यपूर्ण कौशल्य आवश्यक आहे, असे किर्लोस्कर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे माजी सह उपाध्यक्ष कृष्णा गावडे यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'आझादी का अमृत महोत्सव'अंतर्गत आयोजित 'कौशल्य व उद्योजकता विकास कार्यशाळे'चे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील हे अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम झाला. गावडे म्हणाले, 'आजच्या नोकरी, व्यवसाय व उद्योगधंद्यामध्ये पुढील दहा वर्षांमध्ये अमूलाग्र बदल झालेला दिसून येईल. त्यासाठी भविष्यकाळ ओळखून आताच्या पिढीने आवश्यक कौशल्य गुण अंगीकारणे महत्वाचे आहे. ज्या क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांना आनंद आणि समाधान मिळतो त्या क्षेत्राची निवड करावी.'

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'जग ज्याप्रमाणे बदलत आहे, त्याप्रमाणे आपले ज्ञान बदलणे आवश्यक आहे. स्पर्धेच्या जगामध्ये टिकण्यासाठी शिक्षण आणि अध्यापन पद्धतीमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांनी नावीन्यपूर्ण बदल, सर्जनशीलता, संवाद कौशल्ये वाढण्यासाठी योग्य ते प्रयत्न केले पाहिजेत. कौशल्याशिवाय भविष्यामध्ये संधी मिळणे अशक्य आहे. दृष्टी आणि दृष्टीकोन बदललात तर जग बदलेल. घरातील आणि उद्योग व्यवसायातील समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थी आणि उद्योजकांनी अतिसूक्ष्म विचार करणे गरजेचे आहे.''

डॉ. पी. डी. राऊत, डॉ. खंडागळे, डॉ. के. बी. पाटील उपस्थित होते. कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. महेश चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कौशल्य व उद्योजकता विकास कार्यशाळेत बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.**

20 APR 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा २५ पासून

## ऑफलाइन पद्धतीने होणार : १० मेपर्यंत अर्ज करण्याची मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या परीक्षा दि. २५ मे पासून ऑफलाइन पद्धतीने होणार आहेत. ओएमआर शीटच्या माध्यमातून परीक्षा घेण्यात येणार आहे.

रसायनशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, संख्याशास्त्र, भौतिकशास्त्र, गणित,



प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, आदी विविध २५ अधिविभागांतील एकूण ३० अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यापीठाकडून दि. २५ ते २९ मे दरम्यान परीक्षा घेण्यात येणार आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील पाच, सांगलीमधील तीन आणि सातारा जिल्ह्यातील सहा, बेळगाव आणि सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येकी एका केंद्रावर ऑफलाइन स्वरूपात परीक्षा होणार आहे. या परीक्षांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १० मेपर्यंत आहे. अर्ज करण्यासह परीक्षा शुल्क भरण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने पूर्ण करायची आहे.

20 APR 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा २५ मेपासून

## वेळापत्रक जाहीर; १० मे अर्जाची शेवटची मुदत

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाकडून पदवी, पदव्युत्तर व दूरशिक्षण विभागाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाची ऑनलाईन अर्ज प्रक्रिया राबविण्यात येत आहे. २५ मे पासून प्रवेश परीक्षांना सुरुवात होणार आहे.

यूजीसी व एआयसीटीईच्या नियमावलीनुसार विद्यापीठातील अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांमधील विविध अभ्यासक्रमांच्या २०२२-२३ च्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. नियोजित वेळापत्रकानुसार २५ ते २९ मेदरम्यान प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. यात एम.एस्सी., एम.ए., एम.टेक., एमबीए, एमएसडब्ल्यू, बीएस्सी आदी विविध अभ्यासक्रमांचा समावेश आहे. परीक्षेसाठी संलग्नित महाविद्यालयांत केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. १० मेपर्यंत प्रवेश अर्ज प्रक्रियेची शेवटची मुदत आहे.

सकाळ

# विद्यापीठातील प्रवेश परीक्षा अर्ज नोंदणी मुदत १० मेपर्यंत



कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांसाठी २५ ते २९ मे दरम्यान प्रवेश परीक्षा होत आहे. अर्ज नोंदणीची अंतिम मुदत १० मेपर्यंत आहे. प्रवेश परीक्षेकरिता संलग्नित महाविद्यालयांत बैठक व्यवस्था केली आहे. विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

तरूण भारत

# विद्यापीठ प्रवेश परीक्षा अर्ज भरण्याचे वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवीन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील शिवाजी विद्यापीठअंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. २३ एप्रिलपासून ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरूवात होणार असून १० मे अंतिम मुदत आहे. प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या **www.unishivaji.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, तरी विद्यार्थ्यांनी संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून केले आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अधिविभाग व महाविद्यालयातील पदव्युत्तर नियमित व दूरशिक्षणच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षांना २५ मेपासून सुरूवात होणार आहे. यामध्ये एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी., एम. बी. ए., एम. टेक., बी. लिप., एम. लिप., एम. एस. डब्ल्यू, जर्नालिझम आदी विषयांचा समावेश आहे. तरी विद्यार्थ्यांनी पेमेंट गेटवेच्या माध्यमातून प्रवेश परीक्षेचे शुल्क भरून, ऑनलाईन अर्ज भरावयाचा आहे. पदवी अंतिम



- **२०२२-२३ नवीन वर्षातील प्रवेश परीक्षेची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध**
- **शनिवारपासून अर्जभरणी सुरू**
- **पेमेंट गेटवेच्या माध्यमातून प्रवेश शुल्क**

वर्षाची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेसाठी पात्र मानले जाणार आहे. परंतु प्रवेशाच्यावेळी गुणपत्रिकेची प्रत सादर करणे आवश्यक आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, याची नोंद अधिविभाग, महाविद्यालय आणि विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.